कार्यालय पोलीस अधीक्षक,
गडचिरोली दि. २६/०९/२०१७

# जिल्हा पोलीस अधिकारी/कर्मचाऱ्यांकरीता सिकलसेल तपासणी शिबीर

काल दिनांक २५/०९/२०१७ रोजी गडचिरोली जिल्हा पोलीस व आरोग्य विभाग गडचिरोली यांच्या संयुक्त विद्यमाने पोलीस मुख्यालय गडचिरोली येथे सिकलसेल तपासणी शिबीर आयोजित करण्यात आले. सदर शिबीरामध्ये एकूण २७५ पोलीस अधिकारी व जवानांची सिकलसेल तपासणी करण्यात आली. तपासणी दरम्यान ज्या कर्मचाऱ्यांना सिकलसेलचे निदान झाले अशा कर्मचाऱ्यांना पुढील तपासणीकरीता पाठविण्यात आले. याचबरोबर उपस्थित सर्वांना सिकलसेलबाबत मार्गदर्शनही करण्यात आले. मा. पोलीस अधिक्षक डॉ. अभिनव देशमुख व अपर पोलीस अधिक्षक डॉ. हरी बालाजी यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी डॉ. रामटेके, सिकलसेल जिल्हा समन्वयक प्रशांत खोब्रागडे व चमू तसेच पोउपनि सम्राट वाघ यांनी सदर शिबीराचे यशस्वी आयोजन केले.



